# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २१० /२०२५ दि.०८/०९/२०२५

**—: <u>वाहतूक नियंत्रण अधिसूचना</u> :—**

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक २२/०९/२०२५ रोजी पासुन नवरात्री उत्सव हा साजरा होणार आहे. सदर उत्सवाचे अनुषंगाने भवानीचौक, टेंभीनाका, ठाणे या ठिकाणी देवीच्या स्थापनेकरीता दिनांक ०८/०९/२०२५ रोजी पासुन मंडप उभारणीचे काम चालू होणार आहे. सदर मंडप उभारणी दरम्यान परिसरातील वाहतुक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** १) ठाणे स्टेशन येथुन टॉवरनाका मार्गे व दगडीशाळा चौक बाजुकडुन विर सावरकर रोड टेंभीनाक्याकडून सिव्हिल हॉस्पीटलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहानांना (टी.एम.टी. व एस.टी. बसेस सह) **टेंभीनाका, सुजय हॉटेल कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही टेंभीनाका, सुजय हॉटेल कट येथुन उजवे वळून घेऊन ठा.म.पा. शाळा क्रं. १७ येथून कोर्टनाका सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) चरई कडुन एदलजी रोडने भवानी चौक टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धोबीआळी क्रॉस ( मे.फेअर अपार्टमेंन्ट )** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने ही धोबी आळी क्रॉस (मे.फेअर अपार्टमेंन्ट) पर्यंत सरळ जावून डावीकडे वळून धोबी आळी चौक–डॉ.सोनुमिया रोड– धोबीआळी मशिद–सिव्हिल हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने व मिनाताई ठाकरे चौकाकडुन सिव्हील हॉस्पीटल कॉर्नरमार्गे टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **सिव्हील हॉस्पीटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर येथुन जी.पी.ओ. मार्गे कोर्टनाका सर्कल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कीग –** **दगडी शाळा, सेंट जॉन बॉप्टीस्ट हायस्कुल (जुना मुंबई आग्रा रोड), दांडेकर ज्वेलर्स, उत्तम मोरेश्वर आंग्रे, अहिल्यादेवी गार्डन, धोबीआळी परिसरात, डॉ. सोनु मिया रोड ते सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर या परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

सदर अधिसूचना ही दि.०८/०९/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. पासुन ते दि.२१/०९/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. पावेतो अमंलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**<u>प्रति,</u>**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर